# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## Dr. S. R. Ranganathan & Dr. A.P.J. Abdul Kalam Birth anniversary - 2018-19

## Dr. A.P.J. Abdul Kalam Birth anniversary 2018

### Reading Inspiration Day

### (Wachan Prerana Din)

In this programme thought provoking speech gave by renowned author Prof. Shesherao Mohite on “Let us talk on the books” *(Pustak Vachan Anand dai Pravas)* on 15/10/2018. This type of programme is organized to encourage students to read and use the library resources to develop themselves. Total 106 student participate.












सकाळ

# लातूर पॅटर्नमुळे अवांतर वाचनाचा ऱ्हास

## डॉ. शेषराव मोहिते यांचे मत, दयानंद महाविद्यालयात कार्यक्रम

लातूर : दयानंद वाणिज्य महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रा. डॉ. शेषेराव मोहिते. यावेळी डॉ. राजाराम पवार, अंकुशकुमार चव्हाण, पी. बी. कोरे आदी उपस्थित होते.

लातूर, ता. १९ (बातमीदार) : लातूर पॅटर्नमुळे विद्यार्थ्यांतील अवांतर वाचनाचा ऱ्हास होत आहे. अभ्यास आणि अवांतर वाचन यामध्ये फरक आहे. घरात पालकांनी मुलांसाठी ग्रंथालय तयार करावे. सुसंस्कृत मने बनविण्यासाठी ग्रंथ वाचनाशिवाय पर्याय नाही, असे मत लेखक प्रा. डॉ. शेषराव मोहिते यांनी येथे व्यक्त केले.

येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालय ग्रंथालय विभाग आयोजित भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार होते. यावेळी डॉ. अंकुशकुमार चव्हाण, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी प्रा. पी. बी. कोरे, ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध गॅझेटच्या माध्यमातून जे वाचन केले जाते ते तकलादू आहे. इंटरनेटवरून पुस्तक वाचनाने डोळे आणि डोके दुखू लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ग्रंथांची संगत करावी. पुस्तकासारखे जवळचे मित्र आई-वडीलही नसतात. वाचनाचा संकल्प सर्वांनी करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. प्रास्ताविक ग्रंथपाल विठ्ठल जाधव यांनी केले.

Aurangabad, Latur-Today
20/10/2018 Page No. 3



# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात वाचन प्रेरणादिन

लातूर / प्रतिनिधी

दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त झालेल्या वाचन प्रेरणादिनानिमत्त 'ग्रंथवाचन : आनंददायी प्रवास' या विषयावर कार्यक्रम साहित्यिक प्रा. शेषेराव मोहिते यांचे मार्गदर्शन झाले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार होते. डॉ. अंकुशकुमार चव्हाण, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी प्रा. पी. बी. कोरे, ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रभारी प्राचार्य डॉ. पवार यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रास्ताविक ग्रंथपाल विठ्ठल जाधव यांनी केले. सूत्रसंचलन बाळू चौगुले तर आभार लक्ष्मीकांत वाघ यांनी मानले.

यावेळी वाणिज्य विभागप्रमुख डॉ. आर. एस. पवार, डॉ. ब्रिजमोहन दायमा, डॉ. जे. व्ही. कुलकर्णी, डॉ. बी. टी. चव्हाण, प्रा. मनीषा अष्टेकर, डॉ. साईनाथ उमाटे, प्रा. बालाजी कांबळे, प्रा. ए. एम. साखरे, प्रा. ए. बी. गुंजाळ यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी ललिता शेटीया, उषा जाधव, शिवरानी दुबे, तानाजी सुतार, बाळू चौगुले, सचिन शिंदे, कलिम शेख, सोमनाथ घोडके यांनी प्रयत्न केले.